देशोन्नती दि. ०१।०४।१९

# मुला-मुलांच्या सुरक्षितेसाठी 'पोलिस ताई आणि पोलिस काका' हा कार्यक्रम

प्रतिनिधी / ३१ जुलै

चंद्रपूर : स्थानिक विठ्ठल मंदिर वार्ड, चंद्रपूर येथील चिल्ड्रेन्स अर्केडमी इंग्लीश मिडीयम, स्कूल, चंद्रपूर येथे पोलिस सारथी यांच्या वतीने मुली व मुलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस ताई व पोलिस काका हा कार्यक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमात संकटात सापडलेल्या महिला व मुली तसेच जेष्ठ नागरिक यांना ज्यावेळी मदतीची गरज आहे. त्यावेळी त्यांनी काय करावे ? याचे मार्गदर्शन या कार्यक्रमात करण्यात आले. तसेच मुलांना लैंगिक अत्याचार म्हणजे काय ? याविषयी माहिती देण्यात आली. मुलाना ते सुस्पष्ट समजावे याप्नाठी, व्हिडिओ क्लीप्स दाखविण्यात आल्या यात संकटात सापडल्यावर स्वतःची कशी सुटका करून घ्यावी याची स्पष्ट माहिती देण्यात आली. त्यासोबतच त्यांनी मुलांना त्यांचा टोल फ्रि क्रमाक १०९१ दिला अनेकदा मुला मुलींना समोवताली होणाऱ्या लेंगिक अत्याचारा सामोरे जावे लागत असल्यामुळे आपण स्वतः तत्पर कसे रहाते हा या कार्यक्रमामागचा उददेश होता. तसेच मुला व मुलींवर होणारा अत्याचार या विषयी आई, वडिल किंवा शिक्षक यांच्यासोबत स्पष्ट बोलता येत नसल्यास त्याची तक्रार लिहून तक्रार पेटीत टाकावी व ती तक्रार पेटी शाळेत लावण्यात आलेली आहे . याचीही माहिती विद्यार्थाना देण्यात आली या तक्रार पेटीतील तक्रारीची दक्षता घेवून त्यावर योग्य ती अंमलबजावणी करण्यात येइल हे सुध्दा मुलांना सांगण्यात आले. या कार्यक्रमात शाळेतील ५ वी ते १० वी पर्यतच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता हा कार्यक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली इंगोले तसेच शाळेच्या व्यवस्थापिका अक्षता मोगरे यांच्या वतीने घेण्यात आला हा कार्यक्रम पोलिस सारखी प्रजा झाडे व जितेंद्र चुनारकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

